**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २४१** **दिनांक :- ०६/०९/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०१ पिडित मुलीची सुटका.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे अधिकारी यांना गोपनीय माहिती मिळाली की, रु.नं.३०२/सी विंग, रेखा रिट्रेट को.ऑ.हौ. सोसायटी, मिरारोड पूर्व या ठिकाणी महिला वेश्यादलाल वैशाली सोनी व तीचा साथीदार सुजीतकुमार गुप्ता असे दोघे मिळुन पुरुष गिऱ्हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात त्यांचे रहाते घरी मुली पुरवितात अशी खात्रीशीर बातमी मिळाली. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस. एस. पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन १५.१५ वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल वैशाली अमित सोनी, वय-३७ वर्ष व तिचा साथीदार सुजितकुमार ब्रेनकुमार गुप्ता, वय-२७ वर्ष यांना वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबद्दल्यात मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ मुलीची सुटका करण्यात आली. सदर बाबत महिला वेश्यादलाल व तिचा साथीदार यांना अटक करुन त्यांचेविरुध्द पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २९७/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

आरोपी वैशाली सोनी हिचे विरुध्द एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे, बोरिवली (प.),मुंबई येथे अशाच प्रकारचा गुन्हा दाखल असुन त्यामध्ये शिक्षा भोगुन आलेली आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे वपोनि. श्री. संपतराव पाटील, मसपोनि. तेजश्री शिंदे- भरोसा सेल, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा./१९८७ विजय ढेमरे, पो.हवा./२२९८ विजय निलंगे, पो.हवा.१६३ रामचंद्र पाटील, पो.शि./३६६० केशव शिंदे, मपोना/२८४५ कमल चव्हाण, चा.पोना/२६३८ सम्राट गावडे यांनी केली आहे.

-----oooo-----